
# मराठीतील स्त्रियांची आत्मचरित्रे - एक दृष्टिक्षेप



डॉ. सुनिता सुनील उम्रस्कर

स्त्रियांनी लिहिलेली आत्मचरित्रे हा मराठी वाङ्मयविश्वातील मोलाचा दस्तऐवज आहे. सव्वाशेहून अधिक स्त्रियांची आत्मचरित्रे आजवर प्रकाशित झाली आहेत. या आत्मचरित्रांनी मराठी साहित्यात एक महत्त्वाचे दालन निर्माण केले. रमाबाई रानडे यांचे 'आमच्या आयुष्यातील काही आठवणी', लक्ष्मीबाई टिळकांचे 'स्मृतिचित्रे', आनंदीबाई शिर्के यांचे 'सांजवात', हंसा वाडकर यांचे 'सांगते ऐका', स्नेहप्रभा प्रधान यांचे 'स्नेहांकिता', अनुताई वाघ यांचे 'कोसबाडच्या टेकडीवरून', गोदावरी परुळेकर यांचे 'जेव्हा माणूस जागा होतो'. मल्लिका अमरशेख यांचे 'मला उध्द्वस्त व्हायचय' माधवी देसाई यांचे 'नाच ग घुमा', सुनीता देशपांडे यांचे 'आहे मनोहर तरी', कमल पाध्ये यांचे 'बंध-अनुबंध' शांताबाई कांबळे यांचे 'माझ्या जल्माची चित्तरकथा', बेबी कांबळे यांचे 'जिणं आमुचं', उर्मिला पवार यांचे 'आयदान' यांसारख्या लेखिकांनी स्त्रियांचे अनुभवविश्व आपल्या लेखनांतून समृद्धपणे साकारले आहे.

सर्वसाधारपणे स्त्रीचे जीवन पाहता त्याचे तिन वर्ग करता येतात. एक गट आहे ऐहिक गरजापूर्ती झाल्याने संसारात सूख मानणाऱ्या स्त्रिया, दुसरा संसार करतानाही बौद्धिक उत्कर्षासाठी तडफडणाऱ्या स्त्रिया आणि तिसरा वर्ग सर्व प्रकारच्या ऐहिक सुखांना मागे सारून केवळ 'बुद्धिवादी' म्हणून जगणं पसंत करणाऱ्या स्त्रिया. या तत्त्वांवर आधारीत मराठीतील स्त्रियांच्या या आत्मचरित्र लेखनावर दृष्टिक्षेप टाकण्याचा हा प्रयत्न आहे.

पुरुष प्रधान आणि स्त्रीचे दुय्यमत्व या सनातन काळापासून चालत आलेल्या परंपरेला मराठीतील स्त्रियांच्य आत्मचरित्राने एक वेगळच

अधिष्ठान प्राप्त करून दिले आहे. पुनर्विवाह, बालविवाह, वारसाहक्क, मतदानाचा हक्क असे वेगवेगळे प्रश्न घेऊन स्त्रीलढ्याला सुरवात झाली. सर्वप्रथम तिने शिक्षण घेतले पाहिजे तरच ती आर्थिक स्वावलंबी होईल, समाजात समर्थपणे एकटी उभी राहू शकेल या हेतूने अनेक पुरूष समाजसुधारकांनी स्त्रीसाठी लढा पुकारला. रमाबाई रानडे (आमच्या आयुष्यातील काही आठवणी), काशीताई कानिटकर (चरित्र आत्मचरित्र) या स्त्रियांनी आपल्या आत्मचरित्रातून आपल्या उन्नती व उत्कर्षामागे असलेला पतिचा वाटा मोठ्या आनंदाने स्विकारलेला दिसतो. स्त्रिच्या जीवनाचा व तिच्या जगण्याचा एक नवा पैलू समाजासमोर प्रकट केला. या स्त्रिया ह्या केवळ संसारामध्ये रमणाऱ्या स्त्रिया नव्हत्या तर समाजकार्य करून आपले वेगळेपण सिद्ध करणाऱ्या स्त्रिया होत्या. गोदावरी परुळेकरांचे 'जेव्हा माणूस जागा होतो', व अनुताई वाघ यांचे 'कोसबाडच्या टेकडीवरून' सारख्या आत्मचरित्रातून संसाराव्यतिरिक्त एका स्त्रीने समाजासाठी केलेला त्याग, धैर्य, चिकाटी पाहता मन थक्क होते.

'स्मृतिचित्रे'पासून 'आयदान' पर्यंतच्या स्त्रियांच्या आत्मचरित्रांतून प्रकटलेले अनुभवविश्व डोळ्यांपुढे आणले तर सर्वसामान्यपणे स्त्रीला तुच्छ लेखण्याची समाजाची वृत्ती प्राधान्याने ध्यानात येते. स्त्रीने आज्ञाधारक व नतमस्तक असणे आणि सोशिक व सेवाशील असणे हेच तिच्याकडून सातत्याने अपेक्षिले गेले आहे. कालपरत्वे तिला सोसाव्या लागणाऱ्या यातनांचे स्वरूप बदललेले असेल, जातिपरत्वे तिच्या वाट्याला येणाऱ्या वेदना पालटत असतील, नोकऱ्यांत असणाऱ्या स्थानांनुसार पुरुषवर्गाकडून मिळणाऱ्या वागणुकीतून तिचा होणारा छळ ढोबळ किंवा सूक्ष्म असू शकेल, तथापि हे सारे तपशील कमीअधिक प्रमाणात अखेर स्त्रीच्या पिळवणूकीचे, शोषणाचेच परिणाम सूचित करतात. पारंपारिक स्त्री-जीवनात घडत गेलेल्या स्थित्यंतरामुळे स्त्रियांच्य ठायी जे आत्मभान उत्पन्न झाले त्यांत या आत्मकथनांची मूळ प्रेरणा आहे. ही स्त्री धीटपणे आत्मजीवनाचे रंगरूप न्याहाळू लागली व ते शब्दांकित करू लागली हे मराठी साहित्यामध्ये स्त्रियांच्या आत्मचरित्रांमधील अवस्थांतर महत्त्वाचे आहे.

स्त्रिया स्वतःचे कार्यक्षेत्र आणि जीवनाचा ढाचा घडविण्यासाठी स्वतंत्र झाल्या पाहिजेत हा महत्त्वाचा मुद्दा आहे. याचा प्रत्यय मराठीतील स्त्रियांनी लिहिलेल्या आत्मचरित्राद्वारे येतो. स्त्रियांनी आपल्या पारंपारिक मातृत्व आणि गृहिणीच्या कर्मकांडापुरतेच समाधान मानण्याची गरज नाही तर पुरुषांच्या बरोबरीने जीवनातील प्रत्येक क्षेत्रात समान पातळीवर त्या सहभागी होऊ शकतात, याचा प्रत्यय ही आत्मचरित्रे वाचताना येतो.

पाश्चात विचारधारेतून आलेल्या स्त्रीवादाचा परिणाम त्यांच्या आत्मचरित्रातून काही प्रमाणात आढळतो. सिमान द बोव्हा यांच्या भूमिकेतून स्वातंत्र्य आणि समता ही परस्परांच्या विनिमयातून साधली जाणारी मूल्ये सर्वांसाठीच आवश्यक आहेत. या आत्मचरित्रातून आलेली स्त्रियांची परिस्थिती विशेषतः असे सूचित करते की स्त्री पुरुषासारखीच मुक्त आणि स्वायत्त माणूस आहे. ज्या जगात ती जगते त्या जगात पुरुष तिला 'इतर' हा दर्जा स्वीकारण्यास भाग पाडतो. स्त्रीमध्ये परिपूर्ण सामाजिक अस्तित्व असते हे मान्य केलेले नसते. बूव्हाच्या मते मानवतावादी नैतिकता अमलात आणायची तर जीवनात येणाऱ्या सर्व अनुभवांना मानवी हक्क प्राप्त व्हायला हवा आणि म्हणूनच यामध्ये स्वातंत्र्य वा मुक्ततेचे मूल्य अत्यावश्यक ठरते. सर्व बाबतीत तिला 'इतर' हे स्थान मिळाले आहे, त्या स्त्रीला व्यक्ती म्हणून ओळखले गेले पाहिजे.

विवाहाच्या निवडीचे स्वातंत्र्य घेतलेली, वडीलधाऱ्यांच्या विरोधात जाऊन आपला निर्णय कायम ठेवणारी आणि त्याच्या परिणामांनाही निश्चयाने सामोरी जाणारी ही स्त्री काही आत्मचरित्रातून दिसते. आत्मचरित्रांतील निवेदनांमध्ये, त्यांनी केलेल्या भाष्यांमध्ये त्यांचा झालेला भावनिक आविष्कार दिसतो. विवाह हे प्रेमावर आधारित नसतात, तर त्यामागे व्यवहारिक गणिते असतात. नवरा बायकोमधील नाते समता आणि परस्पर समन्वय यावर आधारित नसते, तर त्यामध्ये एक स्वच्छपणे उतरंड असते. या आत्मचरित्रातील एकंदर पति-पत्नीचे नाते पाहता पाहता विवाह स्त्रीला पुरुषापेक्षा फार मोठी किंमत द्यायला लावतो. स्त्रिया अशा तऱ्हेने वाढविल्या जातात की त्या आपल्या आयुष्याचा विचारच विवाहाच्या संदर्भात करतात.

या स्त्रिया मुक्त होऊ इच्छितात पण एक चौकटीमधील ती मुक्तता आहे. जीवनामध्ये नवरा हेच काय ते त्यांचे ध्येय आहे. त्यामध्ये जगताना जे काही अनुभव येतात त्याच्यातून घुसमट होते व त्याचा विरोध करताना त्या दिसतात.

'मला उध्दवस्त व्हायचय', 'आहे मनोहर तरी', 'बंध अनुबंध' यासारख्या आत्मचरित्रामधील स्त्रिया एका तीव्र मानसिक तणावातून जातात. तिला आपल्या जीवनातून पुरुषाला नाकारायचे नाही. तिला स्वतंत्र्य अस्तित्व निर्माण करायचे आहे की ती खऱ्या अर्थाने पुरुषासाठी जगू शकेल. दोघांनी परस्परांना कर्तेपणा अथवा 'व्यक्ती' चा दर्जा दिला की मग प्रत्येक जण दुसऱ्यासाठी 'इतर' म्हणून जगामध्ये वावरू शकेल. या स्त्रिया व्यक्ती म्हणून जगण्याची धडपड करतात. आपल 'स्त्री असणं' 'व्यक्ती' म्हणून जगत असताना आड यावं हे त्यांना मान्य नाही.

या सगळ्या प्रामाणिकपणे आपल्या जीवनाचे कथन करीत जातात. विवाहाच्या निवडीचे स्वातंत्र्य घेतलेली मल्लिका अमरशेख, कमल पाध्ये सारख्या स्त्रियांच्या वाट्याला नंतर अवहेलनाच येते. एका स्वप्नमय विश्वात तरंगत असतानाच मल्लिका अमरशेख चे आयुष्य विवाहानंतर दुःखमय होते. स्वतःला सावरण्याचा प्रयत्न ती करते. काही प्रमाणात अहंकारी तर काही प्रमाणात कमकुवत असलेली मल्लिका मात्र एकटेपणातून मार्ग काढण्यासाठी व्यसनाधिन होते. ती म्हणते, "मी सर्वार्थाने मला नष्ट, उद्ध्वस्त करून घ्यायचं ठरवलंय.'...'आर्थिक स्थैर्य म्हणजे आयुष्य हे मला पटत नाही. आयुष्य एकदाच मिळतं, ते अस भांडत रडत काढायच? उमेदीची वर्ष भकास एकाकीपणात काढायची? लग्न हा जुगार आहे. शेवटी सुखी व्हायचं असेल तर मुळूमुळू रडत बसून चालणारच नाही. सुख हव? हिसकावून घ्या. स्वातत्र्य हवं? ओरबाडून-खेचून घ्या. आयुष्यान मला हा दुर्मिळ, न विसरता येणारा धडा शिकवला. आता आयुष्य हा माझ्या दृष्टीनं एक चॅलेंजिंग गेम होता...मी आव्हान स्वीकारलं होत....सगळ्यांचच...एका पुरुषाचं... परिस्थितीचं...मी किती झुरळासारखं जगतेय? स्वतःचा तिरस्कार वाटावा, या इतकी वाईट न लज्जास्पद गोष्ट दुसरी नसेल जगात. जगलेल्या आयुष्याहून ही भावना मरणप्राय न असह्य अशी आहे, की मी काहीही नवीन निर्माण करू शकत नाही...एका पुरुषापलीकडे मी का जाऊ शकत नाही?" अशाप्रकारे ती आपली मर्यादा तपासून पाहते व शेवटी आपला लढा आपल्यालाच द्यायला हवा या जाणिवेने सिद्ध होते.

पराभव कबूल करणं हा एक त्या पराभवाइतकाच क्लेशदायक अनुभव असतो, स्वतःला खोल खोल कोसळताना पाहावं न तरीही आपण स्वतःला त्या अधःपतनापासून वाचवू शकत नाही ही जाणीव फार कठोर असते...यातून एक विलक्षण बदल तिच्यात होतो....पराभवानं ...नैराश्यानं संतापून ती आक्रमक न उद्धट होत

जाते. तापट हेकेखोर, चिवट न विलक्षण टोकाचा बंडखोरपणा....एकही उणादुणा शब्द ती सहन करत नाही. मार खाऊनही ताठ नजरेन त्याला प्रत्युत्तर करत राहते. ती म्हणते, 'केळीची साल सोलून काढावी, तसं मी माझ्याभोवताली ढोंगी, खोटी न दिखाऊ आवरणं फेकून दिली...माझं अस्सल स्त्रीत्व खणखणीत वाजत होतं....निर्लज्ज, आदिम, आक्रमक पण तेवढच मनस्वी न हळवं. आपल्या स्त्रीत्वावर अपार प्रेम करणारी मल्लिका स्वतःला प्रश्न विचारते, 'मी ही नाळ का तोडू शकत नाही? सर्वसामान्य चाकोरीतलं निष्पाप निरुपद्रवी सुरक्षित जगणं मला का जमत नाही? धड चाकोरी नाही धड चाकोरीबाहेरलं आव्हानात्मक जगणही नाही... असलं काहीतरी अर्धवट....केवळ एका पुरुषाला समर्पित होण्यासाठी माझं आयुष्य का असावं? मी एक स्त्री, एक आदिम शक्ती, या सर्वभर पसरलेल्या चैतन्यदायी निसर्गाच मी एक प्रतीक. कृतीमध्ये ती कमी पडते. ठामपणे निर्णय घेण्यास ती कोलमडते. पण तरीही आपण स्वतःला प्रश्न करू शकते या नव्या जाणिवेचा जन्म झालेला असतो, तो तिच्यातला आत्मविश्वास वाढवतो. ती म्हणते मी मध्यमवर्गीय आहे; आणि सर्वस्व एकवटून प्रेम करायला मला आवडतं, हे दोन दुर्गुण आहेत' संवेदनशील मन आणि व्यक्तिस्वातंत्र्यांची जाणीव हा त्या दृष्टीनं शापच असतो त्या परिस्थितीत.....पुरुषाचा 'इगो' ही आजच्या समाज-व्यवस्थेची अत्यंत विकृत न जीवघेणी गोष्ट आहे; जीला खतपाणी घालताना स्त्रियांना अभिमान वाटतो. स्त्री आणि पुरूष निसर्गाच्या दोन प्रकृती आहेत. प्रवृत्ती आहेत. समान दोघंही अपूर्ण; पण तितकेच सामर्थ्यशाली. मग ती दुय्यम करण्याची ताकद असताना स्त्रीनं पुरुषी वर्चस्व का स्वीकारावं स्वतःला मिटवून?

या आत्मचरित्रांतून या लेखिका मानवी नातेसंबंधाचा शोध घेताना दिसतात.

सुनिता देशपांडे यांचा प्रेमविवाह झालेला, अत्यंत बंडखोर वृत्ती असूनही पु. ल. भोवतीच तिच विश्व फिरतं. त्यामुळे निर्माण झालेले ताणतणाव ती अनुभवते. ती म्हणते "जो काही संसार केला तो तन्मय होऊनच केला. पण हळूहळू ही तन्मयता हरवत गेली खरी. एकटेपणातून आलेल्या भावनेमध्ये ती अनेकदा हरवून जाते. ती म्हणते, 'ह्या अफाट विश्वालादेखील शेवटी मर्यादा ह्या आहेतच. मग माझ्यासारख्या क्षुद्र जीवाची काय कथा? माझी धाव तरी असून असून किती दूरपर्यंत असणार? शेवटी कधीतरी पायांतली शक्ती संपत येतेच. मग कोसळून पडण्यापूर्वी आपणहून थांबण्यातच शहाणपणा नाही का?" अशाप्रकारचे एकटेपण तिला जाणवते. संसार करत असताना पुरे झाला हा संसार आणि हे प्रेम. घर सोडून जावे असाही विचार त्या करतात. पण जावं म्हणजं कुठं जावं हे त्याना कळत नाही. 'हे' नको आहे असं वाटायचं इतकचं. पण मग 'काय' हवं याला उत्तर नव्हतं. लग्न करायला तयार होते. तेव्हा तिला वाटले होते, हे बंधन ज्या क्षणी नकोसे होईल त्या त्या क्षणी ते आपण झुगारून देऊ. एखाद्या व्यक्तीच्यापुढे असा क्षण अकस्मात येऊन उभा राहत असेल....ज्यावेळी हे बंधन तोडायला हवे, वेगळे व्हायला हवे, हा विचार पक्का व्हायला लागतो आणि त्या दिशेने मंथन सुरू झाल्यावर दुसरेच एक चित्र स्पष्ट होतं. त्यांच्या सहजीवनाच्या या मधल्या काळात एका वेगळयाच बंधनात तिने स्वतःला गुंतवून घेतल्याचे लक्षात येते आणि हे बंधून तोडू पाहणे किंवा नाकारणे म्हणजे बेजबाबदारपणा आहे असे वाटू लागते. ती आपल्या संसाराबद्दल विचार करते. "इतकी वर्ष हा दोघांचा संसार झाल्यानंतर स्वतःचा एकटीचाच विचार करणं हे तितकसं सोपं नाही. पण गेली काही वर्ष ही प्रक्रिया चालू आहे आणि आता मनाने मी पूर्ण मोकळी, सुटी, पुन्हा एकटी झाले आहे. तशी मी आयुष्यभर स्वतंत्रच

होते; पण स्वतःहुनच स्वतःला कुठे कुठे गुंतवत आले. भाईच्या संसाराच्या निमित्ताने तर सातत्याने अनेक गोष्टीत गुंतवून घेतलं. पण त्या कशाचच मला कधी बंधन वाटलं नाही. कारण जे काही करत गेले ते आनंदाने, स्वयंनिर्णयाने आणि आता स्वयंनिर्णयानेच सर्व रेशीमधागे सोडवून मोकळी झाल्यावर ही अदृश्य जबाबदारी का जाणवत राहिली आहे? बंधने कुणी लादली की बंडखोरी जागृत होते. आपण लढा द्यायचा पवित्रा घेतो. पण स्वतःहून स्वीकारलेली बंधने स्वतःच तोडून टाकली, तरी ते पाश काचतात का?'' आत्मचरित्र लिहिताना लेखनास दुहेरी परिणाम लाभतो. तो भूतकाळातील घटना, प्रसंगी आजच्या संदर्भात मांडण्याचा प्रयत्न करतो. ते केवळ निवेदन नसते तर येथे जीवनाचे व कार्याचे मूल्यांकन करण्याचा प्रयत्न असतो. या आत्मचरित्रातूनही आत्मशोधाची प्रेरणा विशेष कार्यप्रवण होताना दिसते.

आत्मचरित्रकारासभोवतालची सर्व महत्त्वाची व प्रभावी व्यक्तिमत्त्वे आपापल्या विशेषांसह रेखाटली जातात. त्यामध्ये घटनाची सूत्रबध्द निवड केली जाते ज्यामध्ये लेखन एकसंध व परिणामकारक होते. स्त्रियांच्या आत्मचरित्रामधून आलेली प्रभावी व्यक्तीमत्वे म्हणजे त्यांचा नवरा. या एकाच पात्राभोवती त्याचे जीवन गुरफटलेले जाणवते. त्यातूनच ती फुलतात आणि कोमेजूनही जातात. आपल्या संसारी जीवनाचे त्या निवेदन करतात.

'कोसबाडच्या टेकडीवरून', 'जेव्हा माणूस जागा होतो' यासारख्या आत्मचरित्रातून स्त्रीचे एक वेगळे रुप दिसते. त्या संपूर्ण व परिपूर्ण वाटतात. पुरुषांवर विसंबून राहून सुख व दुःख शोधणे त्या नाकारतात. आदिवासी वारली समाजात वावरत असताना अनेक दुस्तर परिस्थितीना त्या सामोरे जातात. समाजकार्य करताना स्वतःच्य वैयक्तिक भावभावनांना कुठेच थारा नसतो. स्त्रीमध्ये असलेल्या उत्कट आणि प्रचंड शक्तीचा प्रत्यय त्यांच्या लेखनातून वारंवार येतो.

ज्यांचे माणूसपणच नाकारले गेले आहेत असा दलित समाज आज कित्येक वर्षे अन्याय अत्याचाराखाली वावरत आहे. या समाजातील स्त्रीचे दुःख तर अधिकच भयावह आहे. या स्त्रीला भारतीय राज्यघटनेने स्वातंत्र्य दिले, समानता दिली. भारतीय घटनेचे पंधरावे कलम सांगते की, भारत राष्ट्र स्त्री व पुरुष असा कोणताही भेद करणार नाही. दलित स्त्री ही आजही शिक्षण क्षेत्रामध्ये मागे आहे याचे कारण तिचे शिक्षणाविषयी असलेले अज्ञान. रमाबाई रानडे, काशिताई कानिटकर या स्त्रिया ह्या समाजधुरिणी होत्या. स्त्रीशिक्षण हे समाजाला व कुटुंबाला कसे घडविणारे आहे हे या स्त्रियांनी जाणले होते. नवरा व घरसंसार यापुरतेच या स्त्रिया आनंदाने जगू शकल्या असत्या तरीही स्त्रीमन समजून स्त्रियांच्या उन्नतीसाठी जगणे हेच त्यांनी आपल्या जीवनाचे ध्येय बनविले. परंपरेने निर्माण केलेल्या स्त्री उन्नतीच्या विरोधात असलेल्या प्रत्येक गोष्टीशी समर्थपणे त्या झुंज देतात. त्यांना घडवितातच त्याचबरोबर स्वतःलाही त्या घडवत जातात. स्त्रीशक्तीचा पाया हा स्त्रीशिक्षणात आहे हे येथे स्पष्ट दिसते.

दलित स्त्रियांच्या आत्मचरित्रपर लेखनात उजवे ठरावे असे आत्मचरित्र म्हणजे शांताबाई कांबळे यांचे 'माझ्या जल्माची चित्तरकथा'. समाज आणि साहित्य या दोन्ही स्तरांवर ते वरच्या पायरीवर जाते. एखादी जिद्दी स्त्री आपल्या वाट्याला आलेल्या प्रत्ययकारी व संघर्षमय जीवनातून शिक्षणाच्या सहाय्याने स्वतः आवर्ताबाहेर पडता पडता आपल्य समाजावरही किती चांगल्या पद्धतीने संस्कार करू शकते याचे हे लक्षणीय उदाहरण आहे. प्रत्येक दुःखाच्या तऱ्हा वेगवेगळया आहेत; परंतु या सगळ्या दुःखातून त्या बाहेर पडलेल्या आहेत आणि

समाधानी आहेत.

उर्मिला पवार यांच्या 'आयदान' या आत्मचरित्रातून जाणवते की दलित स्त्रियांचे दुःख वेगळे आहे. पोटाची भूख ही मूलभूत गरज भागवणे हाच मुळातील जेथे प्रश्न आहे तेथे स्त्रीत्व, स्त्रीवाद याला कुठे थारा असणार, पण तरीही ह्या स्त्रिया खंबीरपणे आपले स्त्रीत्व जोपासतात. उपेक्षा, अवहेलना व दारिद्र्य या शिवाय ज्याच्या वाट्याला काहीही आलेले नाही अशा माणसांची ही कथा असते. तरीही अनेक प्रकारचे कष्ट, अपमान सहन करून कौटुंबिक ताणतणावांना सामोरे जात ही स्त्री स्वतःचे शिक्षण पूर्ण करते. दुःखाला ह्या स्त्रिया कधीच गोंजारत नाहीत. त्यांचा सतत भावनिक, मानसिक, आर्थिक संघर्ष चाललेला असतो. सगळी दुःखे सहन करीत चिवटपणे त्या संसार करतात.

दलितेतर स्त्रियांसारखीच दलित स्त्री ही पुरुषप्रधान संस्कृतीमध्ये दबली गेलेली आहे. ही स्त्री पारंपारिक रूढी नाकारून पुरुषप्रधान चौकटीतून बाहेर येऊ पाहते. ही स्त्री जरी कमावणारी स्त्री असली तरी तिचे घरातील स्थान नाकारलेल आहे; किंबहुना तिच्या वेगळया स्वभावाने ते आपोआप गळून गेलेले आहे. ती स्वतःचे निर्णय स्वतः घेते. नवऱ्याच्या परवानगीशिवाय एम.ए.चे शिक्षण पूर्ण करते. दलीतत्व हे कायम स्वरूपी तिच्यावर जन्माने लादल्यामुळे तिला घराबाहेरही हीन वागणूक दिली जाते. समाजाने लादलेली जातिव्यवस्था ती नाकारते व बौद्ध धर्म स्वीकारते. परंपरेने लादलेल्या जोखडातून कायमची मुक्त होऊ पाहते. बौद्ध धर्म स्वीकारल्यामुळे परंपरेने आलेल्या धार्मिक विधी, कर्मकांडाचे थोतांड झुगारून देते. दलित स्त्रीचे सगळे जीवन हे अंधश्रद्धेवर आधारलेले असते. ती अंधश्रध्दाळू नाही. गावामध्ये असणाऱ्या अंधश्रद्धांवर, भुताखेतांवर, कर्मकांडावर ती विश्वास ठेवत नाही. ही स्त्री विज्ञानाच्या अधिक जवळ जाणारी वाटते. येथे ही स्त्री एक सशक्त आई आहे. ती आपल्या मुलांना शिकविते. उर्मिला पवार आपल्या मुलांना डॉक्टर करू इच्छिते व समर्थपणे आपल्या मुलीनांही पूर्ण शिक्षण देते. स्वतःच्या मुलींकडून कोणत्याही प्रकारची अपेक्षा बाळगत नाही. मुलींना शिकवल्याने त्या बिघडतील किंवा तिला कामाला पाठविल्यानंतर घरात आर्थिक हातभार लागेल या आशेने मुलीला शिकवले जात नाही. ती समर्थपणे स्त्री मुक्ती चळवळीमध्ये सहभागी होते. आणि आपल्या सारख्या अनेक स्त्रियांना मुक्त करू इच्छिते. परंपरेच्या प्रवाहात स्वतःला लोटून देणे हे सोपे असते तर परंपरेविरूध्द पोहणे हे खूप कठीण असते. उर्मिला पवार हे कार्य सहजपणे पार पाडते.

पूर्वी आर्थिक ओढाताणीमुळे दलित स्त्री घराबाहेर पडत होती. आज दलितेतर स्त्रीही आर्थिक स्वातंत्र्यासाठी घराबाहेर पडलेली आहे. आणि त्यामध्ये ती आज यशस्वीही आहे. आपण स्वतंत्र आहोत, माणूस आहोत याची जाणीव आज तिला झालेली आहे. अनेक सुधारणाप्रिय लेखकांनी स्त्री-शिक्षणाचा आग्रह धरला. शिक्षणाविषयीचे विचार लेखिकेन अधिक चांगल्या प्रकारे मांडलेला आहे. शिक्षणानेच तिला आत्मस्थितिचे ज्ञान होते आणि शिक्षणानेच नवी दृष्टे येते. दलित समाजातील स्त्रीलाही हे भान आलेले आहे की ती गुलाम बनु शकत नाही. आणि त्यासाठी ती लेखनाला प्रवृत्त होत आहे. आपले जीवन ती नव्याने मांडू पाहत आहे. पुन्हा एकदा ती जगण्यासाठी धडपडत आहे. पूर्वीची स्त्री जी लिहित होती त्यामध्ये स्त्रियांचे कोडकौतुक होत असे नंतर ती आपल्या मनाच्या विविध अवस्था दर्शवू लागली आणि भावविश्वातून ती बाहेर पडू इच्छिते. त्यांचे लेखन हे त्यांच्या जगण्यातूनच जन्मलेले आहे असे वाटते. धर्म, संस्कृती यांच्या नावाखाली होणारे अन्याय अत्याचार याच्या विरूध्द विद्रोहाचा स्वर येथे उमटलेला आहे. स्त्रीचे दुःख,

तिचे दास्य, तिच्यावरील अन्याय अत्याचार हा केवळ आता सहानुभुतीचा व करुणेचा विषय राहिलेला नाही हे या 'आयदान' मधू आढळून येते. ती जशी जगते तशी ती लिहिते. तिचे जिवनानुभव फोल आणि पोकळ वाटत नाही. एक स्त्री म्हणून आलेल्या अनुभवाची भाषा पुरुषापेक्षा वेगळी दिसते.

येथे उर्मिला पवार यांना आलेले अनुभव एक माणूस म्हणून आलेले आहेत, त्याचबरोबर त्या अनुभवाकडे पाहताना समाजाने लादलेले दलितत्त्व याच्यातूनही अनुभव घेते, तसेच ती स्त्री म्हणूनही अनुभव घेते आणि या सगळ्या भूमिकेतून लिहित असताना ती अलिप्तपणे या सगळ्या अनुभवाकडे ती पाहते. ती गतकाळापासून दूर जात नाहीत तर त्या गतकाळातील दुःख स्वीकारून वर्तमानाला एक नवा आकार देऊ पाहते. सांस्कृतिक नाश करणारी पारंपारिक मूल्ये नाकारून समाजाला नवे भान देणारी मूल्ये ती स्वीकारू पाहते. मी माणूस म्हणून मानाने जगणार हा उद्घोष ती करते. स्त्रीपणामुळे लेखनात काही मर्यादा पडतात असे जे म्हटले जाते ते येथे कुठेच जाणवत नाही. उलट स्त्रीपणाच्या मर्यादा ओलांडून त्या बाहेर पडतात.

स्त्रील आज सगळ्या दिशा मोकळ्या आहेत, पण तरीही मर्यादा आहेच. यांचे मुख्य कारण म्हणजे सामाजिक व आर्थिक विषमतेने ग्रासलेला समाज. हा समाज एकसंघ नाही. एकात्म नाही. केवळ दलितच नव्हे तर कुठल्याही स्तरावरील स्त्री ही आजही गुलामीचेच जगणे जगत आहे. भारतीय स्त्री ही चूल आणि मूल यांच्या जबाबदाऱ्यांचे ओझे घेऊन जगत आहे. ती अजूनही कोंडलेल्या अवस्थेत आहे. येथे पवार ह्या अगदी वेगळ्या रूपाने सशक्तपणे पुढे येतात. एक स्त्रीच स्त्रीचे सबलीकरण जास्त चांगल्या तऱ्हेने करू शकते याचा येथे प्रत्यय येतो. सामाजिक, आर्थिक व राजकीय क्षेत्रात परिवर्तन झाल्याने आज स्त्री-जीवन झपाट्याने बदलत आहे. पण एक गोष्ट लक्षात येते की या परिवर्तनाच्या दिशा आजही तशा गुंतागुंतीच्या वाटतात. किंवा त्या अतिशय संथ आहेत. भारतीय घटनेनुसार अस्पृश्यता नष्ट केली पण अस्पृश्यता मनातून जाणे किती अवघड आहे हे प्रत्येकाला जाणवते. तसेच स्त्री-पुरुषांना समान हक्क घटनेने प्राप्त केले, परंतु तिला समानतेने वागवणे हे समाजाला सोपे जात नाही. तिला माणूस म्हणून वागवताना अवघड वाटते.

हा स्त्रीशक्तीचा लढा हा केवळ आर्थिक आणि राजकीय बाबतीतल्या स्वातंत्र्याचा लढा नव्हे तर हा लढा हा सामाजिक व सांस्कृतिक लढा आहे. केवळ स्त्रीला आर्थिक दृष्ट्या समर्थ बनविणे व तिला मतदानाचा हक्क देणे येथेच हा लढा थांबणार नाही तर समाजामध्ये तिला असलेले अनादराचे स्थान व संस्कृतीने तिच्यावर लादलेली गुलामगिरी याच्यातून ती जेव्हा मुक्त होईल तेव्हाच खऱ्या अर्थाने ती सशक्त बनली असे आपल्याला म्हणता येईल.

अनुभव घेण्याची आणि तो अभिव्यक्त करण्याची पद्धती यांचा विचार करताना स्त्री म्हणून वेगळा विचार करण्याची आवश्यकता आहे काय? तर याचे उत्तर होकारार्थी असेल. साहित्याचा विचार करीत असताना त्या साहित्यनिर्मितीच्या लेखकाचा प्रकृतिधर्म व संवेदनशीलता ही लक्षात घ्यावी लागते. आणि हे लक्षात घेत असतानाच त्या लेखकावर झालेले वाङ्मयीन संस्कार, त्याची जीवनदृष्टी, भाषेची प्रगल्भता, कालखंड इत्यादी सुत्रे ध्यानात ठेवावी लागतात. कारण त्याच्यातच त्याच्या जीवनातील कित्येक गोष्टी दडून बसलेल्या असतात. त्याचा शोध घेताना या गोष्टी महत्त्वाच्या ठरतात.

सभोवतालच्या परिस्थितीवर मात करताना होणारी ही मनो-आंदोलने वाचकांना प्रसंगी व्यथित करतात. त्यांच्या वाट्याला असह्य दुःख येत. पण ती बंड करत नाही तिच्यावर झालेले अन्याय मात्र

ती व्यक्त करते.

या स्त्रियांनी लिहिलेली ही आत्मचरित्रे ही सोशिक स्त्रियांची मनोगतेच आहेत असे वाटते. जवळजवळ या सगळयांच स्त्रियांच्या आयुष्यात एक पोकळी, एकटेपण अनुभवास येते. पारंपरिक विचारात स्त्रियांकडे बघण्याचा दृष्टीकोण उदासीनतेचा आहे. तिला परावलंबी अस्तित्वाच्या साच्यामध्ये बघितले जाते, तर पुरुषांना मात्र कृतिशील स्वतंत्र व्यक्ती असे मानले जाते. पारंपरिक भूमिकांनूसार स्त्रियांना गृहिणी आणि पुरुषांना पोषणकर्ता मानले गेल्याने लग्न आणि कुटुंब या संस्था स्त्रियांना दुय्यमत्व देण्यामध्ये पायभूत ठरतात. जे जे पुरुष करू शकतात ते ते आम्ही अधिक चांगल्या पद्धतीने करू शकतो असे सूत्र नाही तर पुरुषांनी आपल्याला समजून समान वागणूक द्यावी, आदरसन्मान करावा अशी ती मागणी आहे. त्यांच्या परंपरावादी भुमिकेला दर्शविलेला हा नकार आहे. या स्त्रिया पुरुषांच्या इतक्याच तज्ज्ञतेने त्यांच्या पातळीवर जाऊन साहित्य, कला, तत्वज्ञान, समाजकार्य याविषयी चर्चा-विचार-विनिमय करू शकतात.

या आत्मचरित्राद्वारे स्त्रिया आपल्या अस्मितेचा शोध घेताना दिसतात. केवळ संसारातच सूख न मानता संसार करतानाही बौद्धिक उत्कर्षासाठी तडफडणाऱ्या, स्त्रियांच्या सम्यक स्वातंत्र्याचा विचार करणाऱ्या या स्त्रियांच्या आत्मचरित्रातून स्त्रियांचे अनेक प्रश्न मांडले आहेत याचा अल्पसा शोध या लेखनाद्वारे घेण्याचा हा प्रयत्न आहे.

* * *